ठाणे जिल्ह्याचे
सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक

इष्ट ते छापणार
संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

ठाणेवैभव

ठाणेवैभव वैभवी

वर्ष ३९ ★ अंक २१९ ★ रविवार ★ ६ एप्रिल २०१४ ★ रु २

संपादक : मिलिन्द बल्लाळ

# क्रायसेसच्या कमांडने आदिवासी मुली झाल्या हुश्शार

एका क्लिकवर जगाशी संपर्क साधणाऱ्या माहिती तंत्रज्ञान युगात केवळ संगणकीय ज्ञान अवगत नसल्याने आदिवासी पाडा मागे राहत आहे. गरजेपुरते मर्यादित शिक्षण घेणाऱ्या या पाड्याला जगाशी ओळख व्हावी यासाठी येथील मुलींना खास संगणकीय शिक्षण देण्यासाठी 'क्रायसेस' या संस्थेने पुढाकार घेतला आहे.

'क्रायसेस' ही संस्था जून २०१२ साली ठाण्यामध्ये सुरु झाली. परंतु गेल्या १५ ते २० वर्षापासून या संस्थेची टीम आदिवासी लोकांसाठी काम करत आहे. आदिवासी म्हणजे नेमकं काय ? त्यांच्या समस्या कोणत्या ? हे सर्व जाणून घेण्यासाठी ही टीम ओरीसापर्यंतच्या अनेक आदिवासी पाड्यामध्ये जाऊन आली. त्यानंतर त्यांनी 'क्रिएटिव्ह' रिस्पॉन्सिबल इन्टीग्रेटेड (क्रायसेस) ही संस्था निर्माण केली. ठाण्यातील येऊर येथील आनंद आश्रमामध्ये क्रायसेस संस्थेच्या वतीने जव्हार व वाडा तालुक्यातील आदिवासी मुलींना दोन वर्षाचे आयटीचे प्रशिक्षण मोफत दिले जात आहे.



ठाण्यातील अपूर्वा आगवण या प्रकल्पाच्या प्रमुख आहेत. आदिवासी मुलींनी जगात स्वतःचे स्थान निर्माण करावे, सन्मानाने जगावे यासाठी अपूर्वा आगवण यांच्यासोबत नॅन्सी डिसुझा, डॉ. सरीता पारीख तसेच एलिझा व क्लारा ओपेल या जर्मनीतील तरुणी अतोनात प्रयत्न करीत आहेत.

क्रायसेस या संस्थेचे डायरेक्टर ग्लेन फर्नांडीस व त्यांचा मुलगा रॉबेन फर्नांडीस यांनी बनविलेले २ डी आणि ३ डी ग्राफिक्स सॉफ्टवेअर निर्मितीचे प्रशिक्षण ऋच्या महाले, मंगला घाटाळ, उज्वला इलहात, वैषाली भोईर, राधिका खुताडे, निलम रोहणकर, सविता जाधव, रेखा माऊले, सोनाली चौधरी आणि वैशाली दिवे या १० आदिवासी मुलींना दिले आहे. या मुली सध्या अत्यंत जुन्या अशा संस्कृत, जैन पोथ्यांचे डिजीरायझेशन करत आहेत. या मुलींना दहावीचे सिलॅबस असलेले ॲडोकेशनल व्हिडीओ बनवायला सुद्धा शिकवले आहे. ज्याचा वापर करून या मुली आपल्या पाड्यातील लोकांना, आजी आजोबांना बेसिक ज्ञान देऊ शकतात. तसेच त्यांना हिंदी, मराठी,गुजराती भाषेतील टाईपिंग तसेच जर्मन, अरेबिक भाषा देखील शिकवली जात आहे. या व्यतिरिक्त नृत्य, संगीत, अभिनय यांचेही मुलींना प्रशिक्षण दिले जाते.

शिक्षणासोबत या मुली मराठी, गुजराती, हिंदी भाषेतील डेटाएन्ट्री व डीटीपीची कामे करू लागल्या असून आर्थिक दृष्ट्या सक्षम झाल्या आहेत.

'क्रायसेस' संस्थेमध्ये शिकणाऱ्या मुलींना जे ज्ञान दिले जाते ते त्यांनी आपल्या पाड्यातील इतर लोकांना दयावे आणि ज्ञानाचा प्रसार करावा असे या मुलींना कायम सांगितले जाते. ज्यामुळे हळूहळू सर्व आदिवासी पाड्यांचा विकास होऊ शकतो असे आगवण म्हणाल्या.